# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक १९/०४/२०२२ (मंगळवार)

---

## अवैधरीत्या दारू बाळगणारा अटकेत, कारसह एकुण ४,६७,२००/— रू चा माल जप्त
## स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई

दिनांक १९.०४.२०२२ रोजी पोलीस स्टेशन बेला हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना मुखबीर द्वारे गोपनिय माहीती मिळाली कि, अनुराग जुमनाके रा वार्ड क्र ३ दहेगाव हा आपले कारमध्ये अवैधरीत्या देशी दारू वाहुन घेवुन जात आहे. अश्या खबरेवरून स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने बेला ते सोनेगाव कडे जाणा—या रोडवर नाकाबंदी करून सदर कार क्र एम एच ३१ सीएस ३२९५ ची झडती घेतली असता, नमुद कारमध्ये अवैधरीत्या **१४ पेट्या देशी दारू, एकुण ६७२ निपा किंमती ६७,२००/— रू चा माल जप्त करून आरोपी नामे— अनुराग गणेश जुमनाके वय २३ वर्ष रा वार्ड क्र ३, दहेगाव यवतमाळ, यास ताब्यात घेवुन पोलीस स्टेशन बेला चे ताब्यात दिले.**

सदरची कारवाई नागपुर ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधिक्षक श्री विजयकुमार मगर यांचे मार्गदर्शनाखाली स्थानीक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे यांचे नेतृत्वात पो.हवा महेश जाधव, पोना मयुर ढेकळे, पो ना अमृत किंगे, याचे पथकाने पार पाडली.

**(सदर बातमीचा फोटो सोबत जोडला आहे**.)

## जबरी संभोग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. नरखेड**:— दिनांक ०५.१०.२०१८ चे २२.०८ वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. नरखेड येथे अप. क्र. ३६०/२०१८ कलम ३७६ (३),३७६(२),(जे),(१) भादवि सहकलम ४ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक ०५.१०.२०१८ चे १४.०० वा दरम्यान वय १५ वर्ष पीडित ही मतिमंद असुन आपले घरी एकटी असतांना यातील आरोपी नामे— **आशिष रूपराम नेवले वय ३२ वर्ष रा गोधनी तह नरखेड जि नागपुर** याने पिडीतेचा एकांताचा फायदा घेवुन घरात शिरून घराचे आतुन दाराला कडी लावुन पिडीत मुलीवर जबरीने लैंगिक अत्याचार केला. आरोपीला दिनांक ०५.१०.२०१८ चे २३.५३ वा अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. प्रविण सोनोन, पो.स्टे. नरखेड यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक १९.०४.२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश ए एस जे श्री पांडे साहेब, नागपूर यांनी **आरोपीला कलम ४५० भादवि मध्ये ५ वर्ष सश्रम कारावास, व ५,०००/—रु. दंड व दंड न भरल्यास ६ महिने सश्रम कारावास, कलम ३७६(३), भादवि मध्ये २० वर्ष सश्रम कारावास व २५,०००/—रू दंड, दंड न भरल्यास १ वर्ष सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.**

सरकारचे वतीने एपीपी परसोडकर मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन मसपोनि श्रीमती शुभांगी वाझे तर कर्मचारी सहा.फौज. श्री. शंकरराव तराळे, सुनिल डोंगरे, पोहवा श्री. मनोज तिवारी, श्री मधुकर आदमने यांनी मदत केली आहे.

## पळवुन नेणा—या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन बोरी** — अंतर्गत मौजा सातगाव कन्हाळगाव ३ किमी पश्चिम, दिनांक १७/४/२२ चे ०९/०० वा दरम्यान, आरोपी नामे— सुर्या बावनकुळे रा कुजबा याने फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्ष हिला फुस लावुन पळुवुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पो स्टे बोरी येथे नमुद आरोपीविरूध्द कलम ३६३ भादवी अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला, सदर गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि आरती उघडे पोस्टे बुटीबोरी मो नं ८३५५९४७४७३ करीत आहेत.

## प्राणांकित अपघात

**पोलीस स्टेशन उमरेड** :— अंतर्गत मौजा कळमना फाटा राज्यमार्ग क्र ०९ उमरेड ते नागपुर रोड ०२ किमी दक्षिण दि. १७/०४/२२ चे २१/०० वा ते २१/१५ वा १६.४५ वा. दरम्यान, फिर्यादी व त्याची काकु गाडी क्र एम एच ३६ एच ८२९८ मध्ये बसवुन नागपुर वरुन बारवा येथे स्वता गाडी चालवित जात असताना मौजा कळमना फाटा दुभाजक स्टेज हायवे क्र ०९ च्या नागपुर ते उमरेड बाजुने जात असताना यातील आरोपीने आपली मालवाहु गाडी क्र एम एच ०६ ए क्यु ६७०१ ही उमरेड दिशेने कोणतेही साइईड इन्डीकेटर फलक न लावता येनाऱ्या— जानाऱ्या वाहनास अडथळा निर्माण होईल अशा स्थितीत उभे ठेवल्याने फिर्यादीची गाडी क एम एच ३६ एच ८२९८ आरोपीच्या वाहनाला मागच्या बाजुला धडकल्याने फिर्यादीची गाडी विरुदध दिशेने पलटल्याने मागुन येनाऱ्या ईनोवा गाडी क्र एम एच ३२ सी २४९६ ला धडक लागल्याने फिर्यादीच्या डोक्याला मार लागल्याने जागीच बेशुदध झाला व त्याचे मागे बसलेली त्याची काकु नामे सौ अस्मीता अशोक नंदेश्वर वय ५४ वर्ष रा बारवा तह लाखांदुर जि भंडारा ही जागीच मरण पावली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सुमित दौलतजी नंदेश्वर वय २८ वर्ष रा मोढळ तह लाखांदुर जि भंडारा यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन उमरेड येथे आरोपी ट्रक क्र एम एच ०६ ए क्यु ६७०१ चा चालकाविरूध्द कलम २८३, ३३७, ३०४ (अ) भादवी अन्वयें गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि डोर्लीकर पो स्टे उमरेड मो नं ७५८८२३७७६४ करीत आहेत.

## शेतात आग लावुन नुकसान

**पोलीस स्टेशन कोंढाळी** – अंतर्गत हनुमान मौजा पांजराकाटे, दिनांक १७/०४/२०२२ चे ११/३० वा दर यातील आरोपीने आपले शेताच्या धु–याला आग लावुन आग न विझवता घरी निघुन गेला. त्यामुळे त्याने लावलेली आग फिर्यादीचे शेतापर्यंत पसरली व फिर्यादीचे **शेतात असलेल्या डाळींबाचे झाड अंदाजे २००० झाडे अंदाजे किंमत ४,००,०००/– रू, बांबुचे झाडे अंदाजे किंमत ५०,०००/– रू टाकलेली ड्रिप पाईप लाईन किंमत अंदाजे ५०,०००/–रू व शेतात ठेवलेला अंदाजे १२०० पेंडी कडबा किंमत २०,०००/–रू असा एकुण ५,२०,०००/– रू माल आरोपीने लावलेल्या आगीने जळुन नुकसान झाले.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे – मधुकर भांकरराव चरडे वय ४५ वर्श रा ठाणेगाव त कारंजा जि वर्धा मो नं ९८२३१५०६४५ यांचे रिपोर्टवरून पो स्टे कोंढाळी येथे आरोपी नामे– संजय हरीभाउ रेवतकर वय ४८ वर्ष रा.दोडकी याचे विरूध्द कलम ४३५ भादवी अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला, सदर गुन्हयाचा पुढील तपास स फौ दिलीप इंगळे मो नं ९०११११९५२२ करीत आहेत.

## गळफास लावुन आत्महत्या

**पोलीस स्टेशन नरखेड :–** अंतर्गत मौजा मोवाड, यातील फिर्यादी व मृतक हे पती पत्नी असुन त्यांच्या लग्नाला दोन वर्ष झाले होते. दोघांत मोबाईल घेवुन न दिल्याच्या कारणावरून वादविवाद होवुन दिनांक १८/०४/२०२२ चे १७.०० वा. दरम्यान मृतक नामे– सौ ज्योती अखिलेश कुशवाह वय २७ वर्ष रा मतौली जि कन्नोज ह.मु मोवाड ता नरखेड हीने घराच्या सिलींगच्या लाकडी फाटीला ओढनीने गळफास घेवुन आत्महत्या केली.

सदर प्रकरणी फियादी नामे– अखिलेश सुरेन्द्रकुमार कुशवाह वय २५ वर्ष रा.मतौली ता. कन्नोज ह.मु मोवाड ता नरखेड याचे रिपोर्टवरून पो स्टे नरखेड येथे कलम १७४ जा फौ चा मर्ग दाखल करण्यात आला, सदर मर्गचा पुढील तपास महीला पोलीस उपनिरीक्षक सारिका गुरूकर मो. ९६६५८३४९९९ करीत आहेत.

.

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपुर**